SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

बुधवार, दिनांक ३ सप्टेंबर, २०२५

अधिसूचना

क्रमांक : १४६/२०२५ दिनांक : ०३/०९/२०२५

विषय :- करिअर कट्टा शुल्क या उपक्रमाचे शुल्क रचने अंतर्गत उप शिर्षक म्हणून विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क (Extra-curricular व activity fees) या शिर्षकांतर्गत अंतर्भुत करुन अधिसुचना क्र. ७७/२०२४ ला दुरुस्ती करण्याबाबत...

संदर्भ :- १) अधिसूचना क्र. ७७/२०२४, दिनांक १२/०७/२०२४

२) मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/मवि-१/ परिपत्रक-करिअर कट्टा/२०२५/ई. ऑफीस – १८०४२२६, दि. १९/०६/२०२५.

३) विद्या परिषदेचा दिनांक १५.०७.२०२५ रोजीचा निर्णय.

ज्याअर्थी, संदर्भांकीत क्र. १ वरील विद्यापीठ अधिसूचना क्रमांक ७७/२०२४ नुसार सत्र २०२४-२५ पासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यात यावे असे अधिसुचित करण्यात आले आहे. ज्यामध्ये Appendix – A – PART-A अनुदानित अभ्यासक्रम व Appendix – B – PART-A विना अनुदानित अभ्यासक्रम या परिशिष्टातील अनुक्रमांक 7. नुसार Co-curricular & Extra Curricular Activities या उपशिर्षकातील शुल्क आकारावयाची आहे.

आणि

ज्याअर्थी, शासनाने उपरोक्त संदर्भांकीत क्र. २ वरील असलेले पत्रानुसार पुढील प्रमाणे निर्देश दिले आहे.

''करिअर कट्टा या उपक्रमाची अंमलबजावणी करत असताना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय २०१६ अंतर्गत महाविद्यालयाच्या शुल्क निर्धारणाची विविध अधिकार मंडळांची विहीत प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर करिअर कट्टा या उपक्रमाचे शुल्क (रु. ३६५/-) हे वेगवेगळ्या शीर्षकांतर्गत समाविष्ट केले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता राखण्यासाठी करिअर कट्टा या उपक्रमासाठीचे नोंदणी शुल्क (३६५/-) हे विद्यापीठ शुल्क रचने अंतर्गत विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क (Extra curricular व Activity fees) या शीर्षकांतर्गत समाविष्ट करण्यात यावे.''

आणि

ज्याअर्थी, विद्यापरिषदेच्या दिनांक ०३/१०/२०२४ रोजीच्या सभेमध्ये प्रस्तावित केलेल्या प्रस्तावावर झालेल्या निर्णयानुसार व उपरोक्त संदर्भांकीत क्र. २ वरील शासनाचे पत्र विचारार्थ घेवुन अधिष्ठाता मंडळ व शुल्क निर्धारीत समितीच्या शिफारसी विचारार्थ घेता विद्यापरिषदेने विषय क्र. ६८ अंतर्गत दिनांक १५/०७/२०२५ च्या सभेत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा – २०१६ कलम ३३ (१) (e) अंर्तगत मान्यता प्रदान करुन करिअर कट्टा शुल्क असा उपशिर्षक निर्माण करण्यात यावा व यासाठी शुल्क रु. ३६५/- पदवी अभ्यासक्रमाकरीता असलेले फक्त इच्छुक विद्यार्थ्यांकडून आकारण्यात यावी व हे शुल्क व उपक्रम ऐच्छिक स्वरुपात ठेवण्यात यावा तसेच जे विद्यार्थी ऐच्छिक स्वरुपात नोंदणी करतील त्यांच्या कडुनच ही शुल्क आकारण्यात यावी. तसेच शासनाचे दिनांक १५.०१.२०२० च्या पत्रान्वये शिष्यवृत्तीकरीता Extra Curricular Activities व करिअर कट्टा हेड असल्यामुळे शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर शुल्क परत मिळेल.

त्याअर्थी, सर्व संबंधिताना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव अधिसुचित करण्यात येते की, विद्या परिषदेचा उपरोक्त निर्णय व शासनाचे उपरोक्त निर्देशची अमलबजावणी सत्र २०२५-२६ पासून करण्यात यावी. व अधिसूचना क्र. ७७/२०२४ मधील असलेले Appendix – A – PART-A (अनुदानित) तसेच Appendix – B – PART-A (विना अनुदानित) मधील अ.क्र. 7. पुढील प्रमाणे वाचण्यात यावा.

Appendix – A – PART-A

7. (i) Co-curricular & Extra Curricular Activities रु. ९४/-
   (ii) करिअर कट्टा रु. ३६५/- For Undergraduate Courses only

Appendix – B– PART-A

7. (i) Co-curricular & Extra Curricular Activities रु. ९४/-
   (ii) करिअर कट्टा रु. ३६५/- For Undergraduate Courses only

स्वा/-
(डॉ. अविनाश असनारे)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ